## रविवार दिनांक 05 नोव्हेंबर 2017 रोजी ब्राह्मण सेवा संघ, विरेश्वर कॉलनी, चिपळूण येथे आयोजित सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

अभ्यंकर मंडळाची 26वी वार्षिक सर्वसाधारण सभा व कुलसम्मेलन रविवार दिनांक 05 नोव्हेंबर 2017 रोजी नियोजित कार्यक्रम पत्रिके प्रमाणे सकाळी 10 वा. सुरु करण्यात आली.

सर्व प्रथम मंडळाचे कार्यकारी सदस्य श्री विजय भास्कर अभ्यंकर यांनी अभ्यंकर मंडळाच्यावतीने सर्वश्री सुधीर विनायक अभ्यंकर, रत्नागिरी, सुधीर आत्माराम कार्लेकर, बेळगांव व ऍड. सौ. विद्युल्लता अनिल अभ्यंकर, नंदुरबार यांना व्यासपीठावर आमंत्रित केले.

सभेचे अध्यक्ष म्हणून सुधीर विनायक अभ्यंकर यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली. तदनंतर सम्मेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री सुधीर आत्माराम कार्लेकर, बेळगांव व ऍड. सौ. विद्युल्लता अनिल अभ्यंकर, नंदुरबार यांच्या नावाची घोषणा करण्यांत आली.

संमेलनाध्यक्ष, प्रमुख पाहुणे व मंडळाचे अध्यक्ष श्री संजय प्रभाकर अभ्यंकर, उपाध्यक्ष श्री निशिकांत शंकर अभ्यंकर व सचिव श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर यांनी दीप प्रज्ज्वलन, श्री गणेश वंदन, कुलदैवत श्री योगेश्वरी व कुलस्वामी श्री देव व्याडेश्वर यांच्या तसबिरिंना पुष्पहार अर्पण करित वंदन केले व पुढिल कार्यक्रमास रितसर सुरुवात करण्यांत आली.

तदनंतर ज्ञात कै. राजाभाऊ पद्मनाभ अभ्यंकर, बदलापुर; कै.राम व अमित अभ्यंकर, मिरज; कै.सुमनताई अभ्यंकर, नागपूर व अज्ञात व्यक्तिंच्या स्मरणार्थ दोन मिनटे उभे राहून सभेने श्रद्धांजली अर्पण केली.

मंडळाचे कार्यकारी सदस्य श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार यांनी क्रमशः संम्मेलनाध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांची थोडक्यात ओळख करुन दिली व तदनंतर कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे सभेची सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. 1) दिनांक 13 नोव्हेंबर 2016 रोजी पांडुरंग मंगल कार्यालय, अंबेजोगाई येथे संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

मंडळाचे सचिव श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर यांनी दिनांक 13 नोव्हेंबर 2016 रोजी पांडुरंग मंगल कार्यालय, अंबेजोगाई येथे संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सर्वांसमोर वाचून सादर केले व त्यावर अध्यक्षांनी सभेस कोणाला काही शंका असल्यास विचारावे असे सांगितल्यावर सभेने त्यांस सर्व सम्मतीने मंजूरी दिली.

ठराव क्र. 1) असा ठराव सम्मत करण्यांत येतो कि दिनांक 13 नोव्हेंबर 2016 रोजी पांडुरंग मंगल कार्यालय, अंबेजोगाई येथे संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचकः श्री लिलाधर शंकर अभ्यकर अनुमोदकः श्री पार्थ नरेन्द्र अभ्यंकर

विषय क्र. 2) दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचा अहवाल वाचून मंजूर करणे.

मंडळाच्या सचिवांनी दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचा अहवाल सर्वांसमोर सादर केला व त्यावर अध्यक्षांनी सभेस कोणाला काही शंका असल्यास विचारावे असे सांगितल्यावर सभेने त्यांस सर्व सम्मतीने मंजूरी दिली.

ठराव क्र. 2) असा ठराव सम्मत करण्यांत येतो कि दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचा अहवाल सर्वासमोर वाचून सादर केला व त्यास सभेनी सर्वानुमते मंजूरी दिली.
सूचकः श्री विजय कार्लेकर      अनुमोदकः श्रीमती माधुरी प्रदीप अभ्यंकर

विषय क्र. 3) दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचे जमा-खर्च पत्रक वाचून मंजूर करणे.

मंडळाच्या सचिवांनी दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचे जमा-खर्च पत्रक वाचून सर्वांसमोर सादर केले व त्यावर अध्यक्षांनी सभेस कोणाला काही शंका असल्यास विचारावे असे सांगितल्यावर सभेने त्यांस सर्व सम्मतीने मंजूरी दिली.

ठराव क्र. 3) असा ठराव सम्मत करण्यांत येतो कि दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 अखेर पूर्ण झालेल्या वर्षाचे जमा-खर्च पत्रकास सभेनी सर्वानुमते मंजूरी दिली.
सूचकः श्री रामदास दिगंबर अभ्यकर      अनुमोदकः श्रीकृष्ण नारायण अभ्यंकर

विषय क्र. 4) वर्ष 2017-18 या वर्षासाठी सनदी लेखापरीक्षक (चार्टर्ड अकौंटंट) यांची नियुक्ती करणे.
ठराव क्र. 4) दिनांक 1 एप्रिल 2016 ते 31 मार्च 2017 या आर्थिक वर्षासाठी चार्टर्ड अकौंटंटची नियुक्ति करण्याबाबत अध्यक्षांनी सभेस विचारले असता विद्यमान चार्टर्ड अकौंटंट श्री बी व्ही काळे, ठाणे यांना मंडळाचे लेखापरीक्षण करण्यास सम्मति देण्यांत आली.
सूचकः श्री चंद्रशेखर अभ्यकर      अनुमोदकः श्री पुरुषोत्तम अभ्यंकर

विषय क्र. 5) उद्योग क्षेत्रात विशेष कामगिरी करणा-या व्यक्तिला कै. मंगलाताई गोपाळराव अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ “उद्योगश्री पुरस्कार”, प्रशस्ती पत्र व सन्मान चिह्न देऊन जाहिर सत्कार करणे.
ठराव क्र. 5) असा ठराव सम्मत करण्यांत येतो की कार्यकारी मंडळाने ठरविलल्या प्रमाणे “उद्योगश्री पुरस्कारासाठी सर्वश्री सुधीर विनायक आणि अविनाश विनायक अभ्यंकर, खेर्डी, चिपळूण तसेच श्री सुधीर आत्माराम कार्लेकर, बेळगांव यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली व त्यांचा शाल, श्रीफळ, सम्मान चिह्न व प्रमाणपत्र देऊन जाहिर सत्कार करण्यांत यावा.
सूचकः डॉ. संपदा लिलाधर अभ्यकर      अनुमोदकः श्री अशोक गजानन अभ्यंकर

विषय क्र. 6) विशिष्ठ क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त करणा-या उल्लेखनीय व्यक्तिला कै. ज.द. अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ “विशेष नैपुण्य पुरस्कार” व प्रमाणपत्र व सन्मान चिह्न देऊन जाहिर सत्कार करणे.
ठराव क्र. 6) असा ठराव सम्मत करण्यांत येतो की कार्यकारी मंडळाने ठरविलल्या प्रमाणे “विशेष नैपुण्य पुरस्कारासाठी ऍड.सौ. विद्युल्लता अनिल अभ्यंकर, नंदुरबार यांची सर्वानुमते निवड करण्यांत आली व त्यांचा शाल, श्रीफळ, सम्मान चिह्न व प्रमाणपत्र देऊन जाहिर सत्कार करण्यांत यावा.
सूचकः श्री विश्वास दत्तात्रय अभ्यकर      अनुमोदकः श्रीमती सुलभा प्रभाकर अभ्यंकर

विषय क्र. 7) कै. सुधाकर कृष्णाजी उर्फे बापू अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ आजीव सभासदांपैकी कोणाच्या पाल्याने 10वी, 12वी, स्नातक वा स्नात्कोत्तर परीक्षा उत्तीर्ण केल्यास त्यांचा व प्रमाणपत्र, सन्मान चिह्न व पुष्प गुच्छ देऊन जाहिर सत्कार करणे.

ठराव क्र. 7) असा ठराव सम्मत करण्यांत येतो की कार्यकारी मंडळाने ठरविलल्या प्रमाणे "यशश्री पुरस्कारासाठी खालील विद्यार्थी/विद्यार्थींची सर्वानुमते निवड करण्यांत आली व त्यांना पुष्प गुच्छ, सम्मान चिह्न व प्रमाणपत्र देऊन त्याचा जाहिर सत्कार करण्यांत यावा:-

- डॉ. मधुश्री मंदार जोशी, नंदुरबार. विद्यावचस्पतिची उपाधी (P.HD.)
- डॉ. अरुंधती नचिकेत अभ्यंकर, मुंबई. विद्यावचस्पतिची उपाधी (P.HD.)
- कु. स्वरांगी संजय अभ्यंकर. (जुडो कराटेत राज्य व राष्ट्रीय स्तरावर स्वर्ण पदक)
- कु. श्रद्धा विवेक अभ्यंकर, कल्याण बी.एस्सी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. स्वप्नील संजय अभ्यंकर, विरार बी.ई प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. वरदा प्रदिप अभ्यंकर, गावडे अंबेरे बी.कॉम. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. हिमांशु विश्वास अभ्यंकर, नागपुर 12वी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. संकेत प्रदिप अभ्यंकर, गावडे अंबेरे 10वी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. करण प्रमोद अभ्यंकर, चिपळूण 10वी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. अनुराग मनिष अभ्यंकर, बडोदा 12वी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण
- कु. आदिती सतीष अभ्यंकर, डोंबिवली 12वी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

विषय क्र. 8) आजीव सभासदांपैकी ज्या व्यक्तींच्या विवाहाला 50 वर्षे पूर्ण झाली आहे त्यांचा शाल, श्रीफळ व फूलगुच्छ देवून सत्कार करणे.
ठराव क्र. 8) असा ठराव सम्मत करण्यांत येतो की कार्यकारी मंडळाने ठरविलल्या प्रमाणे श्री रामदास दिगंबर व सौ. राजश्री रामदास अभ्यंकर, सांगली यांचा शाल, श्रीफळ, पुष्प गुच्छ व सम्मान चिह्न देऊन त्याचा जाहिर सत्कार करण्यांत यावा.

विषय क्र. 9) आजीव सभासदांपैकी ज्या व्यक्तींनी वयाच्या 75व्या वर्षात पदार्पण केले आहे त्यांचा शाल, श्रीफळ व फूलगुच्छ देवून सत्कार.
ठराव क्र. 9) असा ठराव सम्मत करण्यांत येतो की कार्यकारी मंडळाने ठरविलल्या प्रमाणे खालील सभासदांचा शाल, श्रीफळ, पुष्प गुच्छ व सम्मान चिह्न देऊन त्याचा जाहिर सत्कार करण्यांत यावा:-

(1)श्रीमती मंगला अनंत अभ्यंकर, चिपळूण
(2) श्री श्रीकृष्ण अभ्यंकर, बोरिवली, मुंबई
(3) सौ. राजश्री रामदास अभ्यंकर, सांगली
(4) श्री गजानन केशव अभ्यंकर, रात्नागीरी

विषय क्र. 9) सन् 2017-2021 या कालावधी करीता कार्यकारी मंडळाची निवड करणे.
ठराव क्र. 9) असा ठराव सम्मत करण्यांत येतो की सभेने सर्वानुमते खालील सदस्यांची कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी म्हणून निवड केली आहे:-

- अध्यक्षः श्री निशिकांत शंकर अभ्यंकर
- उपाध्यक्षः श्री नरेन्द्र अनंत अभ्यंकर
- सचिव श्री विवेकानंद दत्तात्रय अभ्यंकर
- खजीनदारः श्री अशोक विद्याधर अभ्यंकर
- कार्यकारी सदस्यः श्री विजय भास्कर अभ्यकर
    - श्री लिलाधर शंकर अभ्यंकर
    - श्री विजय वामन अभ्यंकर
    - श्री संजय प्रभाकर अभ्यंकर
    - श्री जयंत अनंत अभ्यंकर
    - श्री दिलीप गणेश अभ्यंकर
    - श्री वासुदेव अभ्यंकर, ठाणे
    - श्री अशोक विष्णू अभ्यंकर
    - श्री सचिन अभ्यंकर, पुणे
    - सौ. अपर्णा अविनाश अभ्यंकर
    - सौ.अलका मेढेकर, विले पारले
    - श्रीमती आरती कार्लेकर, कुडाळ

सभेच्या शेवटी श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर यांनी अभ्यंकर मंडाळाच्या वेबसाइटच्या होमपेज वर असणा-या विविध विषयाची सविस्तर माहिती सभेला दिली व आवाहन केले की अभ्यंकर कुलवृत्तांत 1992 साली प्रकाशित झाला व त्यानंतर कुलवृत्तांताचे अद्ययावत करणाचे कार्य मंडळाने हाती घेतले आहे, तरी सर्वांनी आपली माहिती मंडळाचे वेबसाईटवर दर्शविलेल्या नमून्यात भरावी किंवा पोस्टाने पाठवावी. तदनंतर ऍड. सौ. विद्युलता अनिल अभ्यंकर, नंदूरबार यांनी त्यांच्या घराच्या शतकपूर्ती सोहळ्याची वीडीयो-ऑडियो सीडिचे प्रदर्शन करण्यांत आले सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

अभ्यंकर मंडळाची पुढिल प्रस्तावित वार्षिक सर्वसाधारण सभा व कुलसम्मेलन रविवार दिनांक 18 नोव्हेंबर 2018 रोजी ब्राह्मण सभा, गिरगांव येथे आयोजित करण्याची घोषणा केली. दुपारी 2 वाजता आभार प्रदर्शन व सुरुचि भोजनाने कार्यक्रमाची सागता करण्यांत आली.

-0—0—0—0-